Impact Factor – 6.261 • Special Issue - 162-C • Mar. 2019 • ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

... Executive Editor of this Issue ...

**Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162-C : Women Empowerment & Scientific Change March 2019

# स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप

डॉ. सौ. एम. आर. वलीवकर
गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर-४४०००९.

भारतीय संस्कृती ही जुनी आहे, प्राचीन आहे, पुर्णपणे विकसित आहे. परिपक्व आहे. तिला बाहेरील देशांचे मापदंड लावून तिची अन्य तुलना करणे योग्य होणार नाही. म्हणूनच भारतीय स्त्रियांच्या विकासाकरीता होणारे विचार हे भारतीय दृष्टिकोनातून करणे योग्य राहते.

प्राचीन भारताच्या इतिहासातील भारतीय स्त्रीचे स्थान हे प्राचीन वाङ्‌मय, धार्मिक कायदेविषयक साहित्य, पुराव्यांमधून होत असतो. याव्यतिरिक्त शिलालेख, ताम्रपट हे दर्शविणारी साधने, लेणी गुफा यांतून कोरलेल्या मुर्ती, भित्तीचित्रे, देवळे, मंदिरे यातील देवतांच्या मूर्ती, त्यांची लोकसाहित्य यामधून दर्शविले जाते.

स्त्रियांचे भारतीय समाजातील स्थान, त्यांच्याविषयी असलेले स्वत:विषयीचे गैरसमज, समाजातील कुटुंबातील स्थिती, वाङ्‌मय कलाकृती इ. गोष्टींमधून माध्यमातून प्रतिबिंबीत सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत वाङ्‌मयातून तत्कालिन घरातील धार्मिक विधीमधील सहभाग, तत्वज्ञानाच्या स्त्रियांचा सहभाग दिसून येतो. वाङ्‌मयातून प्रतिबिंबीत स्त्रीचे स्थान हे गृहस्थाश्रमाची निगडित होते.

महाभारत असो वा रामायण यातील स्त्रिया ह्या राजघराण्यातील ज्ञानसंपन्न होत्या, सधन सुखवस्तू घराण्यातील होत्या. या स्त्रियांना शिक्षण हे नेहमीच बौध्द वाङ्‌मया सुद्धा त्या त्या काळानुसार स्त्रियांकरिता वेगळी शिक्षणपध्दती होती असा उल्लेख मथुरा हे इ. सनाच्या १ ल्या व २ ऱ्या शतकात जैन धर्माचे केंद्र सापडलेल्या शेकडो शिलालेखांवरून तत्कालीन सांस्कृतिक स्त्रियांच्या स्थानांबद्दल व दृष्टिकोनाबाबत अंदाज येतो.

स्त्री हे मातृत्वाचे, सृजनत्वाचे प्रतिक आहे. ती जननी म्हणून ती पुज्य आहे हे सामाजिक स्थान, साहित्यांमधून उत्खननातील पुरव्यांमधून स्पष्ट होते. त्याबरोबर स्त्री प्राधान्य देणारे, तांत्रिकांचे तत्वज्ञान त्यातून निर्माण होणारी तत्कालीन भारतीय समाजाचा श्रध्दांचा एक भाग होय.

भारतात प्राचीन काळापासून ते औद्योगिकरणाच्या टप्प्यांपर्यंत सर्व व्यवसाय, घराघरातून चालत साहजिकच घरातील स्त्रियांचा कामामध्ये सहभाग होता. स्त्रियांना मिळणारे स्वातंत्र्य आणि आर्थिक, धार्मिक निर्णयामधला त्यांचा सहभाग हा नाशिकच्या लेखांतून स्पष्ट होतो. राजघराण्यातील स्त्रिया सेनापती अधिकाऱ्यांच्या स्त्रिया यांनी तर लेख कोरूनच ठेवलेले १६३०-३१-३२ असे सतत दोन वर्षे दुष्काळ पडला या अनेक लोक मृत्यूमुखी पडले तसेच या काळात सतत होणाऱ्या आक्रमणांची धास्ती लोकांच्या मनात होती. स्त्रियांचे आयुष्य लाजीरवाणे व धोकादायक बनले होते.

ब्रिटीशांच्या राजवटीत भारतीय उद्योगधंद्यावर अतिशय जास्त परिणाम झालेत कापड उद्योगांसारखे उद्योग देखील बुडविण्यात इंग्रजांचाच हात होता. देशात बेकारी दारिद्र्य वाढले. या आधीच्या काळातील हजार वर्षे परकिय आक्रमणाने हा समाज भरडला गेला तसेच याचा दयनीय परीणाम समाजातील स्त्रीवर्गावर झाला. इंग्रजी राजवटीतील आर्थिक संकटात सर्व वर्गातील स्त्रियाही भरडल्या गेल्या. या काळात स्त्री शिक्षण हे फक्त उच्चभु समाजातील स्त्रियांना दिल्या जात आहे.

मध्ययुगात सर्वसामान्य स्त्रियांचे सर्व व्यवसायांच्या कौटुंबिक पातळीवरही स्त्रियांचा सहभाग राहत असे स्त्री स्वातंत्र्य तिचे क्षेत्र हे तिच्या कुटुंबाच्या भोवताली होते राजघराण्यातील उच्च आर्थिक स्थितीतील स्त्रियाच सामाजिक, राजकीय क्षेत्रात ठसा उमटवू शकत होत्या त्याचे प्रमाणही अत्यल्प होते याच काळात रयतवारी पध्दती महसुलाकरीता चालू होती. जमीनदार रयतेवर अनेक अत्याचार करीत असत स्त्रियाही भिषण रितीने भरडल्या जात असे.

भारतीय स्त्रींचा वस्तूंच्या उत्पादनातील सहभागाचा प्रवास हा अखंडपणे दोन हजार वर्षे, १८५० पर्यंत चालू असण्याची ग्वाही ऐतिहासिक साधनांमधून मिळते. ही घरगुती कामे सांभाळून कौटूंबिक व्यवसायात काम करणारी भारतीय स्त्री होती हिला नविन युगाचे आर्थिक स्वांतत्र्याचे निकष लावून चालणार नाही. पण ती पतित, निराधार, दीन नव्हती. कौटुंबिक परिघातील एक अत्यंत Active Participant होती.

भारतातून बाहेर होणाऱ्या व्यापाराशी त्यातला वस्तूंच्या उत्पादनाशी स्त्रियांचा अप्रत्यक्ष सहभाग हा वर्षानुवर्षे होता. कुटुंबातील आर्थिक स्थिती सुदृढ करण्यामागे भारतीय स्त्री ही प्रत्यक्षपणे नेहमीच शतकानुशतके हातभार लावीत आली. प्राचीन व्यवसायात स्त्रियांचा सहभाग असे. त्यात शेती, सुतकताई यांचा समावेश असे. स्त्रीशिक्षणाने स्त्रीमत परिपक्व बनले. परीपक्व मत विवेकी विचार करते.

स्त्रियांचा विकास होण्यासाठी विशेषत: आर्थिक आणि सामाजिक नीतिद्वारे हा विकास साधण्यासाठी असे वातावरण निर्माण करणे हे स्त्रीविषयक धोरण आहे. खुद महिला आयोगाने जागतिकीकरणाबद्दल आपले मत व्यक्त करतांना म्हटले आहे. वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेचे जागतिकिकरणामुळे फायद्याचं असमान वितरण झाले. स्त्रियांचे दारिद्र्य अधिक वाढले आहे आर्थिक दरी रूंदावली आहे. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी केले तर त्यांचे व्यक्तिमत्व बदलण्यास निश्चितपणे मदत होईल. ह्या स्वावलंबनामुळे त्यांनी केलेल्या व्यवसायामुळे राष्ट्रीय उत्पन्नवाढीला हातभार लागेल.

भारतात परिवर्तनाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतर सुरू झाली. शुद्र आणि स्त्री ह्यांच्या दृष्टिने फार मोठे असे महत्वाचे निर्णय घेण्यात आले. स्वतंत्र भारताच्या संविधानात 'लिंग समानता' हे तत्व



Printed by : PRASHANT PUBLICATIONS

निर्माण करण्याचे सर्व प्रयत्न केले गेले. स्त्री पुरुष दोघांना त्यांनी समान हक्क आणीवपूर्वक बहाल केले होते स्त्रियांबाबत विशेष कायदा निर्माण केला गेला.

सरकारने नवे महिला विषयक धोरणामध्ये नवऱ्याच्या संपत्तीचा अधिकार, घराच्या रजिस्ट्रीमध्ये पत्नीचे नाव इ. प्रकारच्या समान संधी स्त्रियांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत. सन १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला म्हणून साजरे केले गेले. ८ मार्च हा महिला दिवस म्हणून घोषित करण्यात आला १९७५-१९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित करण्यात आला. यानंतर स्त्री संरक्षणाखातर अनेक कायदे तरतुदी निर्माण करण्यात आल्या ज्यामध्ये १९८१ मध्ये भारतीय दंड विधानाच्या २२४ कलमान्वये बदल करण्यात आला, हुंडा प्रतिबंध कायदा अस्तित्वात आला. १९८५ मध्ये Working Women Welfare Bill 1985 हे खाजगी विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले.

२००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित झाले. सक्षमीकरण किंवा सबलीकरण म्हणजे अधिकारात वाढ करणे व ते अधिकार कसे वापरावे याची जाणीव करून देणे. अनेक समित्या व आयोग स्त्रियांच्या विकासासाठी व त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी निर्माण केले गेले.

स्त्री ही कुठल्याही धर्माची असो. विदेशी असो वा भारतीय तिला माणूस म्हणून जगू द्या. विकास प्रक्रियेत राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी करा. कौटुंबिक व सामाजिक दर्जा तसेच राजकीय शक्ती यातील असमानतेमुळे तसेच परंपरागत पितृप्रधान कुटुंबपध्दतीमुळे स्त्रियांचे कुटुंबातील समाजातील व राजकारणातील स्थान आजही गौण आहे.

२०. व्या शतकाच्या पुर्वार्धात स्त्रियांची सार्वत्रिक शिक्षण घेणारी एक पिढी तयार झाली. त्यामध्ये स्त्रियांची संख्या अत्यंत कमी होती: दुसऱ्या महायुध्दाच्या आसपास सैन्याकरीता विविध खाती जसे अकाऊटंस् डिपार्टमेंट, ऑर्डनन्स फॅक्टरी इ. कार्यालयांचा समावेश होता. यातील व्यवहार बघण्याकरीता शहरातील कनिष्ठ आणि मध्यम वर्गातील सुशिक्षित मुली ह्या सरकारी नोकऱ्यांकडे वळल्या. अर्थाजन करू लागल्या. सुशिक्षित स्त्रियांच्या कालखंडाची सुरूवात झाली. लष्कराप्रमाणेच इतरही खात्यांमध्ये जसे पोस्ट, रेल्वे, टेलिग्राफ स्त्रियांना नोकरीच्या संधी दिल्या जायच्या. यातून फक्त अर्थाजन हाच एकमेव हेतू साध्य केला जात असे.

भारताच्या मध्यमवर्ग त्याचे खरेदी विक्रीचे व्यवहार नवनवीन गृहोपयोगी साधने, करमणुकीचे साधने, पर्यटन दागदागिने ह्या वस्तूंच्या अर्थव्यवस्थेचे परीणाम हे मुख्यत्वेकरून अर्थाजन करणाऱ्यावरील स्त्रियांच्या मतांवर अवलंबून असतात. त्यामूळे नवीन उत्पादकांच्या विक्रीकरीता कंपन्या या वर्गातील स्त्रियांना अधिकाधिक जाहिराती करून आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत असतात.

२१ व्या षतकात स्त्रियांना मिळालेल्या संधीची व्याप्ती अधिक वाढली. स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढले त्याचबरोबर उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची, मुलींची संख्याही वाढली. उच्च शिक्षणाच्या क्षेत्राचा उंबरठा स्त्रियांनी ओलांडला आणि त्या क्षेत्रात आपले पदार्पण केले आहे.

काळानुरूप विविध क्षेत्रात म्हणजे माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, संगणक या शाखांना जसजसे महत्व प्राप्त होत गेले. तसतसे त्या क्षेत्रात काम उपलब्ध होऊ लागले. मुलींनाही [illegible] अनेक संधी प्राप्त झाल्यात.

घरातील लोकांचा मुलींकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. पुर्वीच्या काळी केवळ पदवीपर्यंत शिक्षण देऊन एकदाचे लग्न करून दिले की, जबाबदारी संपली ह्या दृष्टिकोनात बदल आला. पालकांकडून मुलींना शिक्षणाकरीता प्रोत्साहन मिळू लागले.

अर्थाजन ही व्यक्ती स्वातंत्र्याच्या मार्गावरील अपरिहार्य पायरी आहे. मात्र अर्थाजनाचा स्त्रीचा मार्ग सहजसुलभ नाही. शिक्षण मिळाले किंवा एखाद्या व्यवसायात प्रावीण्य संपादन केले की पुरुष सामान्यतः अर्थाजनक्षम होतो परंतू स्त्रीच्या अडचणी असतात. शिवाय अर्थार्जन करणारी स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य मिळू शकेल असे नाही.

२१ व्या शतकात स्त्रियांना मिळालेल्या अनेक संधींची व्याप्ती अधिक वाढली. स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढले आणि त्याचबरोबर उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची, मुलींची संख्याही वाढली. भारतीय स्त्रियांच्या प्रचंड संख्येच्या पुढे हे प्रमाण फार कमी आहे. हेही खरे असले तरी उच्च शिक्षणाच्या क्षेत्राचा उंबरठा स्त्रियांनी ओलांडला आणि त्या क्षेत्रात आपले पदार्पण केले आहे. आज विविध क्षेत्रामध्ये स्त्रिया अग्रस्थानी असलेल्या दिसून येत आहे. मग ते शैक्षणिक क्षेत्र असो, राजकिय, संशोधन असो अशा अनेक क्षेत्रात स्त्रियांनी हजेरी लावली आहे. जरी सर्व क्षेत्रात स्त्री ही अग्रेसर असली तरी कुठे तरी भारतीय समाजात व्यवहारात, घरात स्त्री-पुरूष हे गाडीचे दोन चाके म्हणून कधीच राहत नाहीत तर कायमच पुरूषांच्या मागे स्त्रीने सावलीसारखी प्रतिमा उभी करणे त्याच्याच पावलावर पाऊल टाकीत जाणे हीच आमची रूढी आहे परंपरा आहे.

समाजातील ही परंपरा, रूढी, दूर करणे हेच आमचे आद्य कर्तव्य मानायला हवे. जागतिकीकरणाच्या नावाखाली व्यापारीकरणाची जी भिषण विदारक स्थिती निर्माण केली जात आहे त्यामध्ये नव्या-जुन्या परंपरा, निती, समाजमनाची अवस्था, सगळे सगळेच भरडून निघते ही वस्तुस्थिती आहे.

आधुनिक युगात शैक्षणिक प्रगतीमुळे या सर्वांना वाचा फुटेल. गरज आहे ती मानसिकता बदलण्याची त्यासाठी हा देश, समाज माझा आहे आणि मी याचे देणे लागते ही भावना स्त्रियांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. स्त्री म्हणजे चुल-मुल संसार ही पारंपारिक समजूत निदान शिक्षित वर्गातून हळूहळू हद्दपार होत आहे आणि त्यात गैर काहीच नाही.

**संदर्भग्रंथ सुची :**

१) भारतीय महिलाएं एक विश्लेषण, डॉ. वीना गर्ग, आर्य पब्लिकेशन्स.
२) कार्यशील महिलाओं का समाज मे बदलता स्वरूप, श्रीमती मंजू शर्मा, राज पब्लिशिंग हाऊस.
३) स्त्री अभ्यासाच्या दिशा अथर्व पब्लिकेशन्स.
४) भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, डॉ. स्मीता मेहेत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर.
५) हिंदू संस्कृती आणि स्त्री, आ. ह. साळुंखे, लोकवाङ्मय गृह.
६) स्त्री-प्रष्नांची वाटचाल, विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन.
७) भारतीय स्त्री: एक मीमांसा, सौ.सुधा रिसबुड स्नेहल प्रकाशन.